# ग्रंथालय समिति

ग्रंथालय समिति ही तदर्थ (ॲडहॉक) समिति असून ही समिति विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची मिळून असते. समितीची मुदत समिति घटित झाल्यानंतर एक वर्षासाठी असते. नवीन समिति घटित होईपर्यंत आधीची समिति कार्यरत राहते. ग्रंथालय समितीमध्ये २० सदस्यांचा समावेश आहे. त्यामध्ये दोन्ही सभागृहांचे माननीय पीठासीन अधिकारी हे पदसिध्द सदस्य असून विधानपरिषदेचे माननीय सभापती हे पदसिध्द समितीप्रमुख असतात. उर्वरित १८ सदस्यांमध्ये विधानसभेचे १३ व विधानपरिषदेचे ५ सदस्य, दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी नामनिर्देशित केलेले असतात. विधिमंडळाच्या ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासंबंधी मार्गदर्शन करणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ व इतर वाचनीय साहित्याची निवड, त्यांचे जतन व उपयुक्तता वाढविण्यासाठी मार्गदर्शन व उपाययोजना या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. समितीच्या बैठका साधारणत: नि:सत्र कालामध्ये होतात. सत्रकालामध्येही गरजेनुसार समितीची बैठक बोलविण्यात येते.